जा.क्र./विप्र-७/पीडीएमआयएस/मा.सू/ ३-२४४ /२०२४
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
दिनांक:१४/०६/२०२४

प्रति,

१. विभागीय कृषी सहसंचालक (सर्व) -------------------
२. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (सर्व) ---------------
३. प्रकल्प समन्वयक,किटकशास्त्र विभाग प्रमुख, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली
४. प्रकल्प समन्वयक, किटकशास्त्र विभाग प्रमुख, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
५. प्रकल्प समन्वयक, किटकशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
६. प्रकल्प समन्वयक,किटकशास्त्र विभाग प्रमुख, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

**विषय:** सन २०२४-२५ मध्ये पिकांवरील कीड रोगांची माहिती "कीड रोग सनियंत्रण व माहिती प्रणाली" (पीडीएमआयएस) मध्ये भरण्याबाबत मार्गदर्शक सुचना...

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यात सोयाबीन, कापूस, भात, तूर, मका, ज्वारी, ऊस व हरभरा पिकांवरील कीड रोग व्यवस्थापनाच्या दृष्टीने "पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प" (क्रॉपसॅप) राबविण्यात येत आहे. क्रॉपसॅप अंतर्गत समाविष्ठ पिके वगळून इतर पिकांवरील कीड रोगांची माहिती वेळेत प्राप्त होणे व त्यानुसार शेतकऱ्यांना उपाययोजना करणे शक्य व्हावे याकरीता "कीड रोग सनियंत्रण व माहिती प्रणाली" ही ऑनलाईन संगणक प्रणाली सन २०१७-१८ पासून राज्य कृषी विभागामार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर प्रणालीद्वारे जिल्हास्तरावरुन कीड रोगांची माहिती भरावयाची असून त्या माहिती आधारे कृषी विद्यापिठांतील तज्ञांद्वारे पीक संरक्षणाचे सल्ले संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. विद्यापिठांनी सुचविलेले सल्ले क्रॉपसॅप योजनेप्रमाणेच संबंधीत जिल्हा/उपविभाग स्तरावरुन "किसान पोर्टल" द्वारे शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे प्रसारीत करावयाचे आहेत. त्यानुषंगाने सदर संगणक प्रणाली वापराबाबतच्या मार्गदर्शक सूचना सोबत सहपत्रीत करण्यात येत असून संबंधीतांनी त्यानुसार कार्यवाही करावी तसेच सदर मार्गदर्शक सूचना सर्व क्षेत्रीय कार्यालयापर्यंत वितरीत होतील याची दक्षता घेण्यात यावी.

सोबत: वरीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना

(विनयकुमार आवटे)
**कृषी संचालक, विस्तार व प्रशिक्षण**
**कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत: माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई

**कीड रोग सनियंत्रण व माहिती प्रणाली (पीडीएमआयएस)**

Pest Disease Monitoring and Information System (PDMIS)

**मार्गदर्शक सुचना**

राज्यातील पिकांवरील कीड-रोग व त्यांच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने करण्यात येत असलेल्या उपाययोजना याबाबत केंद्र शासनाकडून दर आठवड्यास आढावा घेतला जातो. त्यादृष्टीने पिकांवरील कीड रोगांबाबत अद्ययावत माहिती उपलब्ध असणे आवश्यक ठरते. "पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प" (क्रॉपसॅप) द्वारे सोयाबीन, कापूस, भात, तूर, मका, ज्वारी, ऊस व हरभरा या पिकांवरील कीड रोगांची माहिती प्राप्त होणार आहे. तथापि, इतर पिकांची माहिती प्राप्त करण्यास होत असलेला विलंब विचारात घेऊन त्याकरीता "कीड रोग सनियंत्रण व माहिती प्रणाली" (Pest Disease Monitoring and Information System (PDMIS)) ही नवीन संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. त्याद्वारे कीड रोगांचे अहवाल भरावयाचे व त्यानुसार पीक संरक्षणाचे सल्ले शेतकऱ्यांना प्रसारीत करावयाचे असून त्यानुषंगाने जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक तसेच कृषी विद्यापीठ यांनी करावयाच्या कार्यवाहीच्या दृष्टीने पुढील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. **वापरकर्ता खाते व पासवर्डचे हस्तांतरण:** कीड रोग सनियंत्रण व माहिती प्रणाली (पीडीएमआएस) व क्रॉपसॅप प्रकल्पाचे सर्व काम हे संगणक आज्ञावलीमार्फत संकेतस्थळाद्वारे होत असल्याने जिल्हा/विभाग/कृषी विद्यापीठ स्तरावरील अधिकारी यांच्यासाठी या प्रकल्पाच्या प्रणालीमध्ये वापरकर्ता खाते व पासवर्ड तयार करुन देण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने अधिकारी यांनी बदली झाल्यानंतर पदभार हस्तांतरण करतेवेळी वापरकर्ता खाते व पासवर्डची माहिती संबंधितांना देण्यात यावी. त्यानुसार बदलीने हजर झालेल्या अधिकारी यांनी लॉगिन करुन प्रोफाईल मधील स्वत:ची माहिती अद्यावत करावी.

२. **जिल्हा/विभाग/ कृषी विद्यापीठ स्तरावरील वापरकर्ता खाते सक्रीय/ कार्यान्वित करणे/ पासवर्ड रीसेट करणे:** सद्यस्थितीत जिल्हा/विभाग/कृषी विद्यापीठ स्तरावरील वापरकर्ता खाते कार्यान्वित आहे. तथापि, आपले वापरकर्ता खाते व पासवर्डची माहिती विसरली असल्यास तो रीसेट करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

२.१ जिल्हा/ विभाग/ कृषी विद्यापीठ स्तरावरील ज्या अधिकाऱ्यांना बदलीनंतर पूर्वीच्या अधिकाऱ्यांकडून वापरकर्ता खाते व पासवर्डची माहिती मिळाली नसल्यास किंवा त्यांच्याकडून वापरकर्ता खाते व पासवर्डची माहिती विसरली असल्यास अशा अधिकाऱ्यांनी आपल्या निकटतम वरीष्ठ कार्यालयातील योजना संबंधित अधिकारी यांना संपर्क करुन आपल्या मुख्यालयाच्या तपशीलाची माहिती द्यावी.

२.२ योजना संबंधित अधिकारी यांनी आपल्या खात्याद्वारे लॉगिन करुन वापकर्ता खाते व पासवर्डची माहिती विसरलेल्या संबंधितांच्या मुख्यालय व वापरकर्ता खात्याची माहितीची वापरकर्ता व्यवस्थापन मेन्यूतील मुख्यालय मेन्यूद्वारे खात्री करावी. त्यानंतर रीसेट पासवर्ड या मेन्यूमध्ये जाऊन सदर वापरकर्ता खाते निवडावे व रीसेट पासवर्ड या बटनावर क्लिक करावे. पासवर्ड रीसेट झाल्यावर सदर पासवर्ड संबंधितांना कळवावा.

२.३ वापरकर्ता खाते व पासवर्ड विसरलेल्या संबंधित अधिकारी यांना वापरकर्ता खाते व रीसेट केलेल्या पासवर्डची माहिती मिळाल्यानंतर त्याद्वारे लॉगिन करुन नवीन पासवर्ड तयार करावा. सदर पासवर्ड किमान

आठ वर्णाचा राहील व त्यात किमान एक वर्ण पहिल्या लिपीतील, एक वर्ण दुसऱ्या लिपीतील, एक अंक व एक विशेष अक्षर उदा. @, #, $ इत्यादींचा समावेश राहील (उदा. Abcd@123).

२.४ पासवर्ड यशस्वीरित्या बदलल्यावर खाते सक्रीय करण्यासाठी आपली विनंती ऑनलाईन प्रणालीद्वारे आपल्या निकटतम वरीष्ठ अधिकारी यांना प्राप्त होईल. अशी विनंती प्राप्त झाल्यास त्यांनी वापरकर्ता व्यवस्थापन मेन्यूमधील नवीन वापरकर्ता सक्रीयण यावर क्लिक करावे. प्राप्त वापरकर्त्यांची खात्री करावी व सदर वापरकर्त्यांची निवड करुन उजव्या कोपऱ्यातील "सक्रीय करा" या बटनावर क्लिक करावे. खाते सक्रीय झाल्यावर त्याची माहिती संबंधीतांना द्यावी.

२.५ वापरकर्ता खाते व पासवर्ड विसरलेल्या संबंधीत अधिकारी यांचे वापरकर्ता खाते सक्रीय झाल्यानंतर त्यांनी लॉगिन करुन वापरकर्ता प्रोफाईलमधील माहिती अद्यावत करावी. प्रोफाईल अद्यावत झाल्यानंतरच वापरकर्ता खाते कार्यान्वित होईल व वापरकर्त्यास त्यांच्यासाठी उपलब्ध मेन्युंचा वापर करणे शक्य होईल.

२.६ जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी (जिल्हा परीषद) व तालुका कृषी अधिकारी स्तरावरील वापरकर्ता खाते सक्रीय करण्यासाठी विभाग स्तरावरील वापरकर्ता खाते सक्रीय असणे आवश्यक आहे त्यादृष्टीने विभाग स्तरावरील क्रॉपसॅप संबंधीत तंत्र अधिकारी यांनी प्रथमत: विभास्तरावरील वापरकर्ता खाते सक्रीय करुन घ्यावे.

**३. कीड रोग सनियंत्रण व माहिती प्रणालीमध्ये ऑनलाईन माहिती भरणे:**

**जिल्हा स्तर:** कीड रोग सनियंत्रण व माहिती प्रणालीमध्ये जिल्हा स्तरावरुन कीड रोगांची माहिती दर आठवड्यास नियमितपणे ऑनलाईन भरावयाची आहे. त्यादृष्टीने खालील प्रपत्राप्रमाणे क्षेत्रीय स्तरावरुन दर आठवड्यास पिकनिहाय कीड रोगांची माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

प्रपत्र

**अहवाल कालावधी दिनांक ................. अखेर साप्ताहीक कीड रोग अहवाल**

**तालुका: ............ जिल्हा: ............... आठवडा क्र.: ............**

**पिकनिहाय कीड रोग तपशील:**

| पीक | पीक पेरणी हंगाम | पीक वाढीची अवस्था | पीक स्थिती | पेरणी लागवड क्षेत्र (हेक्टर) | कीड रोगाचे नाव | कीड रोगाची तीव्रता | कीड रोग प्रादुर्भावाची टक्केवारी | सर्व कीड रोगांचे एकूण प्रादुर्भावीत क्षेत्र हे. | उपचारीत क्षेत्र हे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

| कीटकनाशक पुरवठा | | | जनजागृतीचा तपशिल | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रकार | तांत्रीक नांव | मात्रा (की/लि) | जम्बो | माध्यमाव्दारे | प्रसिध्दी | पाठविलेले | गाव | क्षेत्रीय |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | झेरॉक्सवरील सल्ले | प्रचार | साहित्य | एसएमएस | बैठका | भेटीची गावे |
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| | | | | | | | | |

३.१ विहीत प्रपत्रामध्ये कीड रोगांची माहिती क्षेत्रीय स्तरावरुन दर बुधवारपर्यंत नियमितपणे प्राप्त करुन घ्यावी व दर गुरुवारी सदर माहिती संगणक प्रणालीद्वारे भरावी. बुधवारी सुट्टी असल्यास त्यापूर्वीच्या लगतच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सदर माहिती प्राप्त करुन घ्यावी. तसेच गुरुवारी सुट्टी असल्यास त्यानंतर लगतच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सदर माहिती संगणक प्रणालीद्वारे भरावी.

३.२ कीड रोगांचे अहवाल हवामान प्रमाणभूत आठवडा दिनांक (Standard Meteorological Week Dates) यानुसार दर सात दिवसांनी भरावयाचे असून सदर आठवडा क्रमांक व त्या अंतर्गत येणारे दिनांक संगणक प्रणालीतील ड्रॉपडाऊनमध्ये दिले असून त्याप्रमाणे आठवड्याची निवड करावी.

३.३ आठवडा, पीक व हंगामाच्या निवडीप्रमाणे संबंधीत आठवडा, पीक व हंगामासाठी पूर्वी माहिती भरली असल्यास "निवडलेल्या पीक, आठवडा व हंगामासाठी माहिती उपलब्ध आहे. आपण कीड रोग यादीमधून माहिती भरु किंवा बदल करु शकता" असा संदेश येईल. त्यानंतर त्याच आठवडा, पीक व हंगामासाठी माहिती भरावयाची झाल्यास कीड रोग यादीतील संबंधीत आठवड्यासमोरील संपादन बटनावर क्लीक करुन माहिती भरावी किंवा त्यात बदल करावा.

३.४ **पीक वाढीची अवस्था:** पिकनिहाय पीक वाढीची अवस्था रोप अवस्था, शाखीय वाढीची अवस्था, फुलोरा अवस्था , दाणे भरण्याची अवस्था इ. नमूद करावी.

३.५ **पीक स्थिती:** उत्तम/सर्वसाधारण/वाईट याप्रमाणे नमूद करावी.

३.६ **पिकाचे पेरणी/लागवड क्षेत्र:** दर आठवड्यास सांख्यिकी विभागास दिलेल्या माहितीनुसार पिकाचे जिल्ह्यातील एकूण पेरणी क्षेत्र नमूद करावे व त्यामध्ये विसंगती राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

३.७ **कीड रोग तपशील:** कीड रोगाचे नाव त्यानंतर त्याची तीव्रता निवडावी व त्यानुसार पुढीलप्रमाणे प्रादुर्भावाची टक्केवारी नोंदविण्यात यावी.

| कीड रोग तीव्रता | कीड रोग प्रादुर्भावाची तीव्रता (टक्के) |
|---|---|
| अत्यल्प | ५ पेक्षा कमी |
| अल्प | ५ ते १० |
| मध्यम | ११ ते २० |
| जास्त | २० पेक्षा जास्त |

३.८ तालुक्यांच्या माहितीवरुन जिल्ह्याची एकत्रित माहिती संगणक प्रणालीमध्ये भरावयाची असल्याने एकाच कीडीने एकापेक्षा जास्त तालुक्यातील क्षेत्र बाधीत झाले असल्यास एकाचवेळी सर्व बाधीत तालुक्यांची निवड करण्याची सोय संगणक प्रणालीत करुन दिलेली आहे. त्यानुसार कीड निहाय बाधीत तालुक्यांची निवड करावी.

३.९ **पिकनिहाय कीड रोगांचे प्रादुर्भावीत क्षेत्र व उपचारीत क्षेत्र:** कीड रोगांचे प्रादुर्भावीत व उपचारीत क्षेत्र नमूद करताना एकाच पिकावरील सर्व किडींद्वारे जिल्ह्यातील एकूण प्रादुर्भावीत क्षेत्र व उपचारीत क्षेत्राची बेरीज करुन त्याप्रमाणे पिकनिहाय नोंद करावी.

३.१० **पुरवठा केलेल्या निविष्ठा:** अहवाल कालावधी अखेर पुरवठा केलेल्या कीटकनाशक निविष्ठांचाच तपशील नमूद करावा, निविष्ठांच्या तपशिलामध्ये विविध योजनांद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या पीक संरक्षण औषधांचा समावेश करावा. कृषी विभागासह जिल्हा परिषदेकडील कृषी विकास अधिकारी यांचेमार्फत पुरवठा करण्यात आलेल्या निविष्ठांचाही यामध्ये समावेश करावा. त्यादृष्टीने संबंधीत कृषी विकास अधिकारी यांच्या स्तरावरुन नियमित अहवाल प्राप्त करुन घ्यावेत. कीटकनाशक प्रकार यामध्ये कीटकनाशके, बुरशीनाशके व जैविक कीडनाशके याप्रमाणे विभागणी करावी व त्यानुसार कीटकनाशकाचे तांत्रीक नांव व पुरवठा मात्रा (की/लि) नमूद करावी.

३.११ **जनजागृती:** अहवाल कालावधी अखेर केलेल्या जनजागृती (जम्बो झेरॉक्स, माध्यमाव्दारे प्रचार, प्रसिध्दी साहित्य, एसएमएस, क्षेत्रीय भेटी, गाव बैठका इ.) बाबतचा तपशिल नमुद करावा.

४. **कृषी विद्यापीठ स्तर:** जिल्हास्तरावरुन कीड रोगांचे अहवाल भरल्यानंतर त्याचा तपशील क्रॉपसॅप प्रकल्पांतर्गत सहभागी कृषी विद्यापिठातील शास्त्रज्ञांना उपलब्ध होईल. सदर अहवालाचे विश्लेषण करुन क्रॉपसॅप प्रकल्पांतर्गत कार्यरत संशोधन सहयोगी यांनी कीटकशास्त्र विभाग प्रमुख यांचे मार्गदर्शनाखाली दर मंगळवारी आवश्यकतेनुसार पीक संरक्षण विषयक ऑनलाईन सल्ला वितरीत करावा. मंगळवारी शासकीय, साप्ताहीक अथवा स्थानिक सुट्टी असल्यास त्यानंतर लगतच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी ऑनलाईन पीक संरक्षण सल्ला वितरीत करावा.

५. **उपविभागस्तर:** कृषी विद्यापीठांकडून ऑनलाईन प्राप्त शिफारशींच्या अनुषंगाने क्रॉपसॅप प्रकल्पाच्या सन २०२४-२५ साठीच्या मार्गदर्शक सुचनांचे पत्र जा.क्र./विप्र-७/क्रॉपसॅप२४-२५/अंमासू/२०२४/र -२४१, दि. १२ /०६/२०२४ मधील मुद्दा क्र. ६.७, १४.४.३, १४.४.४ व १४.४.५ मध्ये नमुद केल्यानुसार किसान पोर्टलद्वारे उपविभाग/जिल्हा स्तरावरुन शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे सल्ले प्रसारीत करावेत. उपविभाग स्तरावरील निर्धारीत एसएमएसची संख्या पूर्ण झाल्यास जिल्हा स्तरावरुन शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे सल्ले प्रसारीत करावेत.

६. **कीड रोग व्यवस्थापन:** क्रॉपसॅप अंतर्गत समाविष्ठ पिके व त्याव्यतिरीक्त इतर पिकांवर कीड रोगांचा प्रादुर्भाव नियंत्रणात राहणेच्या दृष्टीने सर्व क्षेत्रीय यंत्रणांनी वेळीच कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबत विविध प्रसिध्दी माध्यमातील बातम्यांची गांभिर्याने दखल घेऊन कीड रोग व्यवस्थापनाच्या दृष्टीने विविध प्रसिध्दी माध्यमांद्वारे शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी. कीड रोग व्यवस्थापनासाठी विविध योजनांमधील पीक संरक्षण घटकांतर्गत निविष्ठांचा वापर करुन प्रादुर्भावग्रस्त क्षेत्र आर्थिक नुकसान संकेत पातळीखाली आणण्याकरिता क्रॉपसॅप प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करण्याची सर्व संबंधीतांनी दक्षता घ्यावी.

७. **सनियंत्रण:**

७.१ **तालुकास्तर:** क्रॉपसॅप प्रकल्पाप्रमाणे उपविभागीय कृषी अधिकारी यांचेकडून आठवडानिहाय ऑनलाईन सर्वेक्षणावर आधारीत एसएमएसद्वारे प्राप्त झालेल्या ॲडव्हायजरीच्या मराठी भाषेतील जम्बो झेरॉक्स करुन मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यक व "आत्मा" अंतर्गत निवडण्यात आलेल्या शेतकरी

मित्र (FF) यांचेमार्फत प्रत्येक गावातील कृषी वार्ता फलकावर तसेच, कृषी सेवा केंद्राच्या नोटीस बोर्डावर वेळोवेळी लावल्या जातील याकडे व्यक्तिश: लक्ष देण्याची संपूर्ण जबाबदारी तालुका कृषी अधिकारी यांची राहील. उपविभागीय कृषी अधिकारी यांचेकडून ॲडव्हाजरीचा एसएमएस प्राप्त करुन घेणे व सदर एसएमएसच्या मराठी भाषेतील जम्बो झेरॉक्स प्रती तयार करुन तालुक्यातील प्रत्येक गावातील कृषी वार्ताफलकावर तसेच, कृषी सेवा केंद्रांवर लावण्याची संपूर्ण जबाबदारी तालुका कृषी अधिकारी व त्यांचे अधिनस्त मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यक यांची राहील. तसेच, ज्या ठिकाणी कीड **रोगांची तीव्रता वाढलेली आहे त्याठिकाणी कीड रोग नियंत्रणाची मोहिम राबविण्याकरिता आपत्कालीन परिस्थितीत विविध योजनांतर्गत पुरवठा करण्यात आलेल्या निविष्ठा शेतकऱ्यांना वेळीच उपलब्ध करुन कीड रोगांची तीव्रता आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या खाली आणण्याची संपूर्ण जबाबदारी तालुका कृषी अधिकारी यांची राहील.**

७.२ **उपविभागस्तर:** कृषी विद्यापीठांकडून ऑनलाईन प्राप्त शिफारशींच्या अनुषंगाने प्रत्येक उपविभागीय कृषी अधिकारी दर आठवड्यास त्यांचे कार्यक्षेत्रातील एसएमएससाठी नोंदणीकृत शेतकरी व तालुका कृषी अधिकाऱ्यांना दोन वेळा एसएमएसद्वारे ॲडव्हायजरी पाठवतील. तसेच, त्या रेडीओ, आकाशवाणी, वृत्तपत्रात निवेदनाद्वारे प्रसिध्दीस देण्याची जबाबदारी उपविभागीय कृषी अधिकारी यांची राहील. उपविभागास आठवड्यास निर्धारीत केलेली एसएमएसची संख्या पूर्ण झाल्यास एसएमएसचा मसूदा जिल्हास्तरावरील नोंदणीकृत युजर्स यांना पाठविणे व त्यांच्यामार्फत सदर सल्ला संबंधीत तालुक्यातील शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे पाठविण्यात आल्याची खात्री करण्याची जबाबदारी उपविभागीय कृषी अधिकारी यांची राहिल.

७.३ जिल्हास्तर: **अधिनस्त कार्यालयांकडून कीड रोगांचे अहवाल व निविष्ठा पुरवठा याबाबतची माहिती संकलीत करणे व ते विहित मुदतीत संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन भरण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांची राहिल.** उपविभागास आठवड्यास निर्धारीत केलेली एसएमएसची संख्या पूर्ण झाल्यास उपविभागाकडून पाठविलेल्या तालुकानिहाय ॲडव्हायझरी एसएमएसच्या मसूद्यानुसार सदर ॲडव्हायझरी जिल्हास्तरावरुन संबंधीत तालुक्यातील शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे पाठविण्याची जबाबदारी प्रथमत: उपविभागीय कृषी अधिकारी व त्यानंतर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांची राहिल. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा मासिक चर्चासत्र तसेच, जिल्हास्तरावर नव्याने स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय कीड/रोग सर्वेक्षण, निदान व सल्लागार पथकाद्वारे कीड रोग परिस्थितीचा दर महिन्याला आढावा घेणे, जनजागृती प्रशिक्षणाचे नियोजन करणे, प्रादुर्भावीत ठिकाणी विविध योजनांतर्गत तरतूद केलेली औषधे त्वरीत उपलब्ध करुन देणे व त्यासाठी कीड रोग नियंत्रणाची मोहिम राबवून कीड रोग प्रादुर्भाव आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या खाली आणण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांची राहील.

७.४ विभागस्तर: विभागातील सर्व जिल्ह्यांकडून अहवाल नियमितपणे भरले जातील याचे पर्यवेक्षण विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाने करावे. सर्व जिल्ह्यांकडून कीड रोगांचे अहवाल नियमित व वेळेत भरणेच्या दृष्टीने विभागीय अधिक्षक कृषी अधिकारी यांनी संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचेकडे पाठपुरावा करुन प्रत्येक सोमवारी अहवाल भरल्याबाबत खात्री करावी. त्याचबरोबर, क्रॉपसॅप प्रकल्पांतर्गत कार्यरत विभागीय सनियंत्रण समितीच्या मासिक बैठकांद्वारे याबाबत नियमित आढावा घेऊन विभागातील

पिकांवरील कीडरोगांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या खाली ठेवण्याच्या दृष्टीने प्रभावी नियोजन व सनियंत्रण संबंधीत विभागीय कृषी सहसंचालक करतील.

**क्षेत्रीय स्तरावरुन नोंदविलेल्या अहवालाच्या आधारे केंद्र शासनास दर आठवड्यास राज्यातील कीड रोग परिस्थिती व त्यावरील व्यवस्थापनाच्या अनुषंगाने करण्यात येत असलेल्या उपाय योजनांबाबत अवगत करण्यात येत असल्याने अहवाल बिनचूक व वस्तुनिष्ठ असतील याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.**

सदर प्रणाली वापराबाबत काही अडचणी असल्यास प्रथत: विभाग स्तरावरील संगणक चालक यांना संपर्क करुन त्याचे निराकरण करावे. सदर अडचणींचे विभाग स्तरावर निराकरण न झाल्यास सदर अडचण महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई यांना Sarang.Kodre@in.ey.comया ईमेलवर पाठविण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सुचित करावे.

(विनयकुमार आवटे)
**कृषी संचालक, विस्तार व प्रशिक्षण**
**कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**